# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४३३/२०१९**

**तक्रारकर्ता श्री. मोअज्जम अली मोहम्मद हनीफ शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -५१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.१२.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २५.११.२०२४ रोजी नोटीस प्राप्त.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित ----"------ |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/०००८७५ प्रकरणी आयोगाने दि.१६.०४.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

अपिलार्थींना अंशत: माहिती दिलेली आहे.

मुद्दा क्र. २ व ३ ची माहिती जन माहिती अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."

उक्त आदेशाप्रमाणे माहिती मिळाली नाही, म्हणून अपिलार्थी यांनी दिनांक २०.०९.२०१९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०६.११.२०१९ रोजी अहवाल मागविला. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक३०.१२.२०२० रोजी आयोगास अहवाल सादर केला आहे.

आजच्या सुनावणीस तक्रारकर्ते उपस्थित असून जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्त्यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या मूळ माहिती अर्जान्वये २०५ झोपडीधारकांची माहिती त्यांना अजुनही अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत. त्यांनी अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती दिलेली नाही. या कारणामुळे आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**१. जन माहिती अधिकारी आजच्या सुनावणीस कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत. या कारणामुळे त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमख् २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु. २५,०००/- दंड का करण्यात येऊ नये या बाबतच्या लेखी खुलासा १५ दिवसात तयांनी आयोगास सादर करावा.**

**२. या प्रकरणी दिनांक २७.०१.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता सुनावणी घेण्यात येईल.**

निर्गमित
07 JAN 2025

**मुंबई**
**दिनांक : २७.१२.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai

---

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४३३/२०१९**
**तक्रारकर्ता श्री. मोहज्जम अली शेख**
**सुनावणी दिनांक : २७.०१.२०२५ (In continuation of order dt २७.१२.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

या प्रकरणी दिनांक २७.१२.२०२४ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले होते:

जन माहिती अधिकारी आजच्या सुनावणीस कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत. या कारणामुळे त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २०(१) अन्वये रु. २५,०००/- दंड का करण्यात येऊ नये, या बाबतच्या लेखी खुलासा १५ दिवसात त्यांनी आयोगास सादर करावा. या प्रकरणी दिनांक २७.०१.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात येईल.

उक्त आदेशास अनुसरुन आजच्या सुनावणीस तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांचेकडे सदर विषयी काहीही माहिती उपलब्ध नव्हती. त्यांनी त्यांचा अनुपालन अहवाल सादर करण्याकरीता वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात आली.

जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.१२.२०२४ चे आदेशानुसार त्यांनी त्यांचा खुलासा आणि सदर तक्रारीविषयी त्यांच्या अनुपालन अहवालासहीत दि. २७.०२.२०२५ रोजी पुढील सुनावणीस उपस्थित रहावे

पुढील सुनावणी दिनांक २७.०२.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ३०.०१.२०२५**

30-1-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**